## <u>रे.मु.नं. ११०/१२ मध्ये नि. ६० खालील आदेश</u>

........

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीतर्फे दिवाणी प्रक्रिया सहिंता क्र. ७ नियम ११ अन्वये वादपत्र नाकारण्याकरता दाखल.

२. पुरेशी संधी देवूनही वादी व प्रतिवादीच्या सुविद्य वकीलांनी अर्जावर कोणताही युक्तीवाद केला नाही. त्यामुळे नि. ६० येथे त्याअनुषंगाने आदेश पारीत करून प्रस्तुतचा अर्ज गुणदोषावर निर्णित करण्यासाठी घेण्यात आला.

३. प्रतिवादींची अशी हरकत आहे की, दावा मिळकत अ.क्र. १ ते १५, १८ ते २१ या मिळकती महाराष्ट्र शासनाच्या विशेष भूसंपादन अधिकारी, सिंधुदुर्ग यांनी अरूणा मध्यम पाटबंधारे प्रकल्पासाठी भूमीसंपदान कायद्याचे तरतुदीनुसार प्रस्ताव क्र. भू.स./ल.पा./नोव./३४/२००७ भोम या प्रस्तावाद्वारे संपादीत केलेल्या आहेत. भूमीसंपादन कायद्यातील तरतुदीनुसार प्रस्तुतचा दावा चालविण्याचा या न्यायालयास कोणताही अधिकार नाही. भूमीसंपदान कायद्याखाली स्वतंत्र तरतूद असून त्याबाबतची न्यायकक्षा दिवाणी न्यायाधीश, व.स्तर या न्यायालयाकडे येते. परिणामी, प्रस्तुतचे वादपत्र नाकारण्याची विनंती प्रतिवादींतर्फे करण्यात आली आहे.

४. याउलट वादीचा असा आक्षेप राहिला आहे की भूमीसंपदान कायद्यात केवळ रक्कम वाटपाबाबत, त्याचे हक्काबाबत, रकमेच्या हिश्याबाबत मे. दिवाणी न्यायालय, व.स्तर यांच्याकडे अधिकारक्षमता आहे. परंतु प्रस्तुतचे कामी वाटपाचा अनुतोष मागण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रतिवादींचा अर्ज फेटाळण्यास पात्र ठरतो.

५. सर्व प्रथम याठिकाणी दिवाणी प्रकीया संहिता क्रम ७ नियम ११(ड) ची तरतूद पाहाणे आवश्यक ठरते. ज्यावेळी वादपत्रात केलेल्या निवेदनावरून दाव्याला एखाद्या कायद्यानुसार रोध आहे असे दिसत असले तर वादपत्र नाकारता येईल. परंतु याठिकाणी ही गोष्ट लक्षात घेणे आवश्यक ठरते की वादीने प्रतिवादींचे विरूध्द दावा मिळकत अ परिशिष्टातील अ.क्र. १ ते २१ जमिन मिळकती व ग्रामपंचायत घर क्र. २४२/१, २४२/२ या घर मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप मागितलेले आहे. वादींच्या कथनानुसार दावा मिळकती या वादी व प्रतिवादीच्या एकत्र कुटुंबाची समाईक मिळकती आहेत. अर्थातच, प्रतिवादींनी नि. ५४ येथे त्यांची कैफियत सादर करताना प्रतिवादी क्र. १ व २ चे वडील व प्रतिवादी क्र. ३ चे दिवंगत पती मयत राजाराम व त्यांचे वडील मयत बाबाजी यांचे मूळात वादी हे वारसच नसल्याचे कथन करून वंशावळ नाकारलेली आहे. अर्थातच वादी हे प्रतिवादींच्या एकत्र कुटुंबाच्या वंशावळीतील सहदायक आहेत किंवा नाहीत हा दाव्याच्या पुराव्याचा व गुणदोषाचा भाग राहातो. याठिकाणी महत्वाचे मुद्दा असा आहे की या न्यायालयाला अधिकारक्षेत्र नसल्याच्या कारणास्तव प्रस्तुतचे दाव्याचे वादपत्र नाकारणे न्यायोचित ठरते का ? मूळातच दावा मिळकत अ.क्र. १६, १७ व २० या मिळकतींबाबत कोठेही भूमीसंपदानाचे अगर आरक्षणाचे

कामकाज चालू नाही



असे सकृतदर्शनी दिसून येते. वादीने त्याच्या वादकथन पत्रामध्येच दावा मिळकतींपैकी काही क्षेत्र शासनाकडून संपादित झाल्याचे व त्याचा मोबदला प्रतिवादी क्र. १ ते ३ हे एकटेच बळकावू पाहात आहेत असे स्पष्टरित्या कथन केलेले आहे. प्रस्तुतच्या दाव्यामध्ये दावा मिळकतीमध्ये वादींना सहदायक या नात्याने हिस्सा असल्याचे कथन करण्यात आलेले आहे. दावा मिळकतींपैकी काही क्षेत्र शासनाकडून संपादन झाले असले तरी सदर क्षेत्रामध्ये वादींचा सहदायक या नात्याने प्रत्येकी १/३ हिस्सा असल्याचे वादीचे कथन आहे. भूमीसंपदान अधिनियम १८९४ कलम १८ चा संदर्भ घेता भूमीसंपदान कायद्यात केवळ रक्कम वाटपाबाबत, त्याचे हक्काबाबत, रकमेच्या हिश्याबाबत व वाढीव रकमेबाबत मे. दिवाणी न्यायालय व.स्तर यांच्याकडे प्रकरण न्यायनिर्णीत करण्याची अधिकारक्षमता असल्याचे पाहाता येते. मूळातच वादीचा दावा हा दावा मिळकतींपैकी भूमीसंपदानाखाली गेलेल्या नुकसान भरपाईची रक्कम मिळणेकरता दाखल नाही. महत्वपूर्ण मुद्दा असा आहे की दावा मिळकतींमध्ये दोन्ही वादींचा प्रत्येकी १/३ हिश्याचा सहदायक या नात्याने हक्क आहे का ? याच अनुषंगाने दाव्यामध्ये हिस्सा ठरवून मागण्यात आलेला आहे. पर्यायाने, प्रस्तुतच्या दाव्याचा अनुतोष पाहाता प्रस्तुतच्या दाव्याला या न्यायालयाचे अधिकारक्षेत्र असल्याचे स्पष्टपणे शाबीत होते. त्याचवेळी प्रस्तुतच्या दाव्याला या न्यायालयाचे अधिकारक्षेत्र आहे किंवा नाही असा वादमुद्दा देखील नि. ५५ येथे उपस्थित केलेला आहे. अर्थातच तो मुद्दा निर्णीत करणे हा पुराव्याचा भाग ठरतो. परंतु केवळ कोणत्याही प्रतिज्ञापत्राविना व सकृतदर्शनी पुराव्याविना प्रतिवादींतर्फे दाखल असलेला प्रस्तुतचा अर्ज हा सद्य स्थितीत फेटाळण्यास पात्र राहातो. सबब, वरील सर्व पुराव्याचे विवेचनावरून न्यायाचे कारणास्तव मी खालील आदेश पारीत करत आहे.

## <u>आ दे श</u>

१. प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येतो.

(रा.म.चौत्रे)
न्यायाधिकारी, ग्रामन्यायालय
<u>वैभववाडी</u>

दिनांक :— २२/०२/२०१७